# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ०२२. ३०२३३४७३/४२४/४३४,

E-mail : dtedesk4a@gmail.com Internet :http//www.dte.org.in

क्र:४अ/आस्था/२०१५/८०२

दिनांक :23 NOV 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे /नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती

विषय: मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षेतील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणिबाबत.

संदर्भ: महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. मरातंशिम/का-२०/२०१५/७२, दि. १८/११/२०१५

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत प्रतिवर्षी दोन सत्रात महाराष्ट्रतील तंत्रनिकेतनाच्या परिक्षा घेण्यात येतात. सदर परिक्षांचे उत्तरपत्रिका तपासणीबाबत काही प्रमाणात गंभीर त्रुटी आढळून आल्या व सदरच्या त्रुटी ह्या तंत्रनिकेतनातील कनिष्ठ अध्यापकांकडून झाल्याचे निर्दशनास आल्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये संचालनालयाच्या निर्दशनास आणून दिलेले आहे. तसेच परिक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यापासून संस्थेतील जेष्ठ अध्यापक अलिप्त राहतात. ही बाब संस्थेच्या प्राचार्याकडून मंडळास ज्ञात झाल्याचे नमूद केलेले आहे.

मंडळाकडून उन्हाळी परिक्षा २०१५ च्या निकालाबाबत संदर्भाधीनबाबींवर मंडळाच्या ३७ व्या बैठकीबाबत चर्चा करताना उपरोक्त बाब अधोरेखीत करण्यात आलेली असून सदर बैठकीच्या इतीवृत्तात सदरची बाब नमूद करून उत्तरपत्रिका तपासणी जेष्ठ अध्यापकांच्या सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने निर्देशित करण्यात आलेले आहे. तसेच हिवाळी परिक्षा २०१५ पासून शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनातून प्रत्येक जेष्ठ अध्यापकांनी २०० उत्तरप्रत्रिका तपासणी करण्याचे अनिवार्य करण्यात यावे व तसे निर्देश शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनाच्या प्राचार्याना देण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये विनंती केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती व संचालक, महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची विनंती विचारात घेऊन आपणास कळविण्यात येते की, हिवाळी परिक्षा २०१५ पासून उत्तरपत्रिका पडताळणीकरीता जास्तीतजास्त जेष्ठ अध्यापकांचा सहभाग करण्यात यावा. तसेच प्रत्येक जेष्ठ अध्यापकांस कमाल २०० उत्तरपत्रिका पडताळणी कराव्यात अशा आशयाचे निर्देश आपल्या विभागातील शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनातील

प्राचार्यांना आपल्या स्तरावरून देण्यात यावेत. तसेच जे जेष्ठ अध्यापक उत्तरपत्रिका पडताळणीच्या कामात सहभाग घेणार नाही अश्या अध्यापकांच्या वार्षिक संपादनुक मुल्यमापन अहवाल व गोपनिय अहवालात तशी नोंद घेण्यात येईल त्यांची जाणीव करून द्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
२. सर्व प्राचार्य शासकीय व अनुदानित संस्था.

---

क्रमांकः-विकाअ/शिक्षण/तपासणी/२०१५/ 2956
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 3 0 NOV 2015

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत** :-१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित संस्था यांना कळविण्यात येते की वरील मा. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्राचे अवलोकन करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.